Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 14 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १४ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

मकर संक्रांतीचा सण आज साजरा होत आहे. सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रित्यर्थ देशभरात उत्सव साजरा केला जात आहे. देशाच्या विविध भागात वेगवेगळ्या नावांनी हा सण साजरा केला जातो. गुजरातमध्ये उत्तरायणाच्या निमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा अहमदाबादच्या जगन्नाथ मंदिराला भेट देणार आहेत. राज्यात विविध ठिकाणी पतंग महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून, जगभरातले पतंगप्रेमी दाखल झाले आहेत. केरळमध्ये सबरीमाला डोंगरावर मकर विलाक्कू साजरी होत असून, तामिळनाडूमध्ये पोंगल, आसाममध्ये बिहू आणि पश्चिम बंगालमध्ये पौष संक्रांती हे सण पारंपारिक पद्धतीने उत्साहात साजरे होत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना या सणांच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिळ आणि गुळाचा गोडवा भरलेल्या भारतीय संस्कृती आणि परंपरेच्या या पवित्र सणाने प्रत्येकाच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि यश मिळो, तसंच सूर्यदेव सर्वांचं कल्याण करो, अशी सदीच्छा त्यांनी व्यक्त केली.

****

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज दिल्लीत होणार्या दहाव्या सशस्त्र सेना माजी सैनिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. भारताचे पहिले कमांडर इन चीफ, फील्ड मार्शल के एम करिअप्पा यांच्या कार्याचा आणि सेवेचा सन्मान करण्याच्या हेतूने हा दिवस साजरा केला जातो. १४ जानेवारी १९५३ ला फील्ड मार्शल के एम करिअप्पा सेवानिवृत्त झाले होते.

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठीचा प्रचार काल संपला. अखेरच्या दिवशी सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांनी आणि उमेदवारांनी प्रचार सभा, रोड

शो, समाजमाध्यम या मार्फत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर आणि पुण्यात प्रचार सभा घेतली आणि प्रचार फेरीमध्ये सहभागी झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील मुंबईतल्या विविध प्रभागांमध्ये महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारामध्ये सहभागी होऊन स्थानिक मतदारांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात रोड शो घेत प्रचार केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत विविध शाखांना भेटी देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे प्रचारासाठी पुणे दौऱ्यावर होते. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देखील काल शेवटच्या दिवशी चंद्रपुरात प्रचार केला. या निवडणुकीसाठी उद्या मतदान होत आहे.

****

मुंबईच्या महापौराच्या संदर्भात जात-धर्माचे उल्लेख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राजकीय पक्षांनी केले आहेत. याप्रकरणी पुरावे मिळाल्यावर संबंधितांना नोटिस पाठवू, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या विरोधातल्या तक्रारीप्रकरणी महापालिका आयुक्तांकडून अतिरिक्त व्हिडीओ मागवले असून, निवडणूक निरीक्षक इक्बाल सिंह चहल यांच्याकडून अहवाल मागवला असल्याचं त्यांनी सांगितलं. या निवडणुकीत आचारसंहिता भंगाच्या ३४१ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यापैकी २८० तक्रारींवर कारवाई पूर्ण झाल्याचं वाघमारे यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठ परिसरात व्याख्यान, रक्तदान शिबिर, यासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

येत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यात देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत कार्यक्रम घेण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागानं याआधीच जाहीर केला असून, यामध्ये राज्यातल्या एक लाख शाळांमधले सात लाख शिक्षक आणि दोन कोटी विद्यार्थ्यांचा सहभाग असेल, असं नियोजन केलं आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातले पाचवी ते आठवीचे एक लाख पंचवीस हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. संस्कार दशसूत्रीचे, रंग देशभक्तीचे, असं या उपक्रमाचं नाव आहे. या उपक्रमाच्या काळात, विद्यार्थ्यांची सुरक्षा, वाहतूक आणि अन्य व्यवस्थापन, या बाबींवर विशेष लक्ष द्यावं, अशा सूचना जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल यासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत दिल्या.

****

नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर इथं श्री संत निवृत्तिनाथ महाराज यांच्या पौष वारीनिमित्त सुमारे दोन लाख वारकरी आणि सुमारे ६०० दिंड्या दाखल झाल्या आहेत. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते आज पहाटे शासकीय महापूजा झाली. त्र्यंबकेश्वर परिसर विकासासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच बैठक घेण्यात येईल, वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून प्रबोधनाचं कार्य सुरू असतं, त्यांचंही मार्गदर्शन घेण्यात येईल, असं भुसे यावेळी म्हणाले.

****

'हिंद दी चादर' श्री गुरु तेगबहादुर यांच्या साडेतीनशेव्या हौतात्म्य वर्षानिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शाळास्तरावर उद्या १५ तारखेपासून जनजागृतीपर उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये १५ ते २३ जानेवारीदरम्यान प्रभातफेऱ्या, माहितीपट, चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा असे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यातही या कार्यक्रमाबाबत जनजागृतीसाठी काल जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते चित्ररथाचं उद्घाटन करण्यात आलं.

दरम्यान, नांदेड इथं होणाऱ्या या कार्यक्रमासाठी काल मैदानाची साफसफाई करण्यात आली. या श्रमदानात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग नोंदवला.

****